# सं पा द की य

## इस्त्रायलचे आक्रमण

२० मे २०२१ रोजी औपचारिक युद्धबंदी घोषित झालेली असली तरी तोवर ६३ लहान मुलांसह २२० पॅलेस्टिनींचा इस्त्रायलच्या बाँबहल्ल्यांमध्ये मृत्यू झालेला आहे आणि दीड हजारहून अधिक नागरिक जखमी झालेले आहेत, हे विसरता येत नाही. त्याचबरोबर पॅलेस्टाईनच्या बाहेर असलेल्या पश्चिम गाझापट्टी, पूर्व जेरुसलेम आणि इस्त्रायलमधील पॅलेस्टिनींवरील हल्ल्यांमध्येही वाढ झालेली आहे. आजवरच्या शिरस्त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये या हल्ल्यांबाबत एकमत निर्माण होऊ शकलेले नाही, परिणामी इस्त्रायलकडून मानवाधिकारांचे उघड उघड उल्लंघन होत असतानादेखील सगळीकडे गुन्हेगारी शांतता आहे.

इस्त्रायली हवाई हल्ल्यांचे लक्ष्य हे पॅलेस्टाईनमधील नागरी वस्त्या व पायाभूत सुविधा राहिले असून अनेक निवासी इमारती आणि इस्पितळे उद्ध्वस्त झालेली आहेत. आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांची कार्यालये असलेल्या इमारती तसेच कोव्हिड – १९च्या प्रयोगशाळादेखील या हल्ल्यांमधून वगळल्या गेलेल्या नाहीत. हे सगळे हल्ले 'दहशतवादविरोधी लढाई' आणि

'स्वसंरक्षणा'च्या नावाखाली घडत आहे हे विशेष. इस्त्रायल – पॅलेस्टाईन झगड्यावर सातत्याने लक्ष ठेवून असणाऱ्या कुणालाही हे सांगता येईल की, दशकानुदशके बेकायदेशीर कब्जा आणि छळणुकीचे लक्ष्य ठरलेल्या पॅलेस्टाईनवर सगळा दोष टाकत राहणे ही इस्त्रायलची जुनीच कार्यक्रमपत्रिका आहे.

इस्त्रायलचा हा दावा की, गाझाभूमीवरील हवाई हल्ले हे 'हमस'ने इस्त्रायलवर जे रॉकेट हल्ले केले त्याला प्रतिसाद म्हणून करावे लागले आहेत हे आजवरच्या इस्त्रायलच्या फसव्या कूटनीतीसाठी साजेसेच आहे. वस्तुस्थिती पाहायची तर, 'हमस'ने इस्त्रायलवर शेकडो रॉकेटहल्ले केलेले आहेत हे खरे. पण म्हणून इस्त्रायलने आम नागरी वस्त्यांवर बेछूट बाँबहल्ले करणे कसे न्याय्य ठरवता येईल? खरे तर, पॅलेस्टिनी नागरिकांच्या कब्जाविरोधात आणि स्वयंनिर्णयाच्या हक्कासाठीच्या संघर्षाचा बिमोड करण्याच्या दशकानुदशकांच्या धोरणाची ताजी आवृत्ती म्हणूनच विद्यमान इस्त्रायली आक्रमण पाहता येते. हा महत्त्वाचा संदर्भ जर लक्षात घेतला नाही तर आपण कब्जाधारकाचाच तर्क योग्य मानू लागतो.

'हमस'ने बाँब हल्ले केले कारण इस्त्रायलने जेरुसलेममधील अल अक्सा मशिदीवर हल्ले केले होते. पूर्व जेरुसलेममधील आपल्या ताब्यात असलेल्या भागात इस्त्रायलने लोकसंख्यात्मक संतुलन टिकवून ठेवण्यासाठी दीर्घकाळापासून प्रयत्न केलेला आहे. इस्त्रायलचा असा दावा आहे की, जेरुसलेम ही आमची राजधानी आहे. पिढ्यानपिढ्या राहात असलेल्या पॅलेस्टिनी नागरिकांना तिथून हुसकावून लावण्याचे धोरण इस्त्रायलचे आहे.

त्यामुळे ‘जमिनीवरील वास्तव’ निर्माण करण्याच्या इस्त्रायलच्या प्रयत्नापोटी पॅलेस्टिनींची हळूहळू पण निश्चितपणे हकालपट्टी सुरू असून बेकायदेशीर ज्यू वस्त्या उभ्या केल्या जात आहेत. १९६७मध्ये जॉर्डनकडून जेरुसलेम जिंकून घेतल्यापासून इस्त्रायलचे हेच धोरण राहिलेले आहे. पॅलेस्टिनींना केवळ ‘निवासी’ म्हणून दर्जा देत ‘नागरिकत्व’ इस्त्रायलने सातत्याने नाकारले आहे. या सगळ्या धोरणांच्या परिणामस्वरूपी आज जेरुसलेममध्ये पॅलेस्टिनी अल्पसंख्यांक बनलेले आहेत.

इस्त्रायली न्यायालयाने शेख जर्रामधील विस्थापनाला मान्यता देणे ही खरे तर इस्त्रायलमधली नित्याचीच बाब होती. पण या वेळेला वेगळे असे घडले की, पॅलेस्टिनींनी वेगवेगळ्या माध्यमातून या निर्णयाला जोरदार विरोध केला, मग ती प्रत्यक्ष रस्त्यावरची निदर्शने असोत वा समाज माध्यमावरील मोहिमा असोत. अल अक्साच्या आवारामध्ये जमलेल्या शेकडो निदर्शकांनी शेख जर्रा विस्थापनाला आळा घालण्याची प्रतिज्ञा केली होती. ८ मे रोजी या शांततापूर्ण मार्गाने निषेध करणाऱ्या जमावावर काहीही कारण नसताना इस्त्रायली पोलीसांनी हल्ला चढवला. तीन दिवसानंतर १९६७ युद्धातील विजयाचा ‘जेरुसलेम दिवस’ इस्त्रायलमध्ये साजरा केला जात असताना पुन्हा एकदा जमावावर हल्ले केले गेले. अल अक्सा मशिदीवरील या लागोपाठच्या हल्ल्यांनी देशातील तसेच देशाबाहेरील पॅलेस्टिनींमध्ये संतापाची लाट पसरली. ‘मशिदीतील पोलीस दल ताबडतोब काढून घ्या नाही तर रॉकेट हल्ल्यांना सामोरे जा’ अशी ‘हमस’ने दिलेली धमकीवजा सूचना ही त्या सार्वत्रिक संताप आणि असहायतेच्या भावनेतूनच

आलेली होती. ‘हमस’कडून डागल्या गेलेल्या काही लघू पल्ल्याच्या आणि प्रायः प्रभावहीन रॉकेटहल्ल्याला इस्त्रायलने आपल्या ‘आयर्न डोम’च्या मदतीने अडवले तर खरे आणि तरीही पॅलेस्टिनी नागरी वस्त्यांवर अंदाधुंद बाँबहल्ले करण्यास सुरुवात केली.

गेल्या १६ वर्षात इस्त्रायलने नियमितपणे असे हवाई आणि लष्करी हल्ले केलेले आहेत. या हल्ल्यांमध्ये गाझापट्टीतील शेकडो नागरिक मारले गेले आहेत. विद्यमान हल्ल्यांच्या आधी इस्त्रायलने २००८ आणि २०१४मध्ये मोठे हल्ले घडवून अनुक्रमे हजाराहून व दोन हजाराहून अधिक पॅलेस्टिनी नागरिक मारले होते.

यावेळी सुरू असलेल्या बाँबहल्ल्यांना इस्त्रायलच्या अंतर्गत राजकारणाचीदेखील जोड मिळाल्याचे दिसते. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू हे आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी झुंजत आहेत. गेल्या दोन वर्षात चारदा सार्वत्रिक निवडणुका होऊनही त्यांच्या उजव्या आघाडीला बहुमत मिळू शकलेले नाही. तसेच त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले गेले आहेत. ही पार्श्वभूमी लक्षात घेता पॅलेस्टिनींवर तीव्र हल्ले का होत आहेत हे सहजी समजून घेता येते. या गोष्टी समजून घेता येत असल्या तरी पुराव्यानिशी सिद्ध करणे अवघड असते. इस्त्रायलमधील विरोधी पक्षांनी अनेकदा हे आरोप नेतान्याहूंवर स्पष्टपणे केलेले आहेत. अशा रीतीने इस्त्रायली सत्तासंघर्षाच्या खेळामध्ये पॅलेस्टिनी नागरिक जणू प्यादीच ठरत आहेत.

आंतरराष्ट्रीय समुदायाने, विशेषतः संयुक्त राष्ट्रसंघाने कायमच

आपल्या कर्तव्यपालनात कसूर केल्यामुळे इस्रायलची गुन्हेगारी वाढत चाललेली आहे. दुसरीकडे पॅलेस्टिनी जनता निराशेच्या खायीत ढकलली जात आहे. अमेरिकेशी असलेले घनिष्ट संबंध तसेच पश्चिम आशियामधील प्रभुत्वशाली प्रकल्पांच्या परिणामस्वरूपी इस्रायलला आज कशाचीही पर्वा राहिलेली दिसत नाही. गेल्या पंधरवड्यातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिसाद हा निराशाजनक असून अनेक पश्चिमी सत्ता इस्रायलच्या पाठीशी उभे राहण्यात धन्यता मानत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेला सदस्यांमधील मतभेद मिटवण्यात दोनदा अपयश आले असून इस्रायलच्या हल्ल्यांवर एक साधी टीका करणारे निवेदनदेखील आजवर काढता आलेले नाही. आपल्या स्वतःच्या जाहीरनाम्यातील हक्क नि अधिकारांविषयीची बांधिलकीदेखील संयुक्त राष्ट्रसंघाला व्यक्त करता येऊ नये हे त्याचे दारूण अपयश आहे. भारतासारख्या देशांनी, ज्यांनी दीर्घ काळापासून पॅलेस्टाईनच्या बाजूने भूमिका घेतलेली आहे, या घडीला पॅलेस्टिनी लोकांच्या नागरी हक्क संरक्षणासंबंधी व मानवाधिकारांच्या पुनर्प्रस्थापनेसंबंधी अधिक कृतिशील भूमिका घेण्याची गरज आहे. इतकेच नाही तर पॅलेस्टाईनवरील कब्जा इस्रायलने सोडावा यासाठी जागतिक जनमत तयार करण्यात भारताने नेतृत्व करण्याची गरज आहे. तरच आपण आपल्या वसाहतवादविरोधी वारशाशी प्रामाणिक आहोत असे म्हणता येईल.

साभार : इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीच्या अंक क्र. २१ (२२ मे २०२१) मधील संपादकीयाचा मराठी अनुवाद : **प्रतिनिधी**